## प्रेस नोट

**दिनांक १२/०९/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील लोणखैरी शिवारातील मृतकाच्या शेतात येथे दिनांक ११/०९/२०२२ चे १५.३० वा. पुर्वी फिर्यादीची वहिनी नामे– **ग.भा.वंदना भीमराव जामगडे (मृतक), वय ५५ वर्ष रा. लोणखैरी वार्ड क्र. १** हिला घरी कोणाला काही न सांगता नातेवाईकाकडे निघून जाण्याची सवय होतीत्र दिनांक १०/०९/२०२२ रोजी ती घरी कोणालाकाही न सांगता निघून गेली होती. तसेच तिला पोटाच्या व मुळव्याधीच्या त्रास होता. फिर्यादी हि आपले दुकानात हजर असतांना गावातील टेकचंद कटरे यांनी सांगितले की, 'तुमची वहिनी ही स्वत:च्या शेतात मरण पावलेली आहे व तिच्या बाजूने विषारी औषध ची बॉटल पडलेली आहे'.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मो न ८२०८५११६६३ हे करीत आहे.

२) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा सरकारी टोला येथे दिनांक १०/०९/२०२२ चे १२.०० वा. ते ०१.०० वा. सुमारास **अश्विनी रामेश्वर उईके(मृतक), वय २२ वर्ष, रा. जंगली फुलझरी** व पेशंट नामे– अरूण सुखदास कोडवते, वय २२ वर्ष, रा. रयतवाडी सरकारी टोला यांनी विश प्राशन केल्याची ग्रामीण रूग्णालय देवलापार येथुन मेडीकल सुचना आल्याने ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे जावुन मृतक मुलगी नामे अश्वीनी उईके हीला विचारपुस केली असता तीने पेशंट नामे अरूण कोडवते सरकारी टोला याच्याशी प्रेम संबध असुन ती दि. ०८/०९/२०२२ रोजी मौजा रयतवाडी सरकारी टोला येथे आली होती. दि. १०/०९/२२ रोजी मृतक मुलगी हीचे दोन मोठे भाउ तिला घेण्याकरीता आले असता 'मी सोबत येत नाही असे सांगीतल्याने ते दोघेही भाउ निघुन गेले' त्या नंतर घरच्यांनी लग्नाकरीता नकार देत असल्यानी दोघांनी स्वताच्याघरी व शेतात उंदराकरीता टाकन्याकरीता आण्लेली खाडन घेतले होते. अशी विचारपुस चालु असतांना डॉक्टरांनी तिचे पल्स रेट वाढत असल्याने तिला विचारपुस करण्यास मनाई केली व तिला प्राथमीक उपचार करून तात्काळ मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर करण्यात आले. उपचार दरम्यान दि ११/०९/२२ चे सकाळी ०९.०० वा. मेडीकल कॉलेज नागपुर येथील डॉक्टरांनी तपासुन मृत झाल्याचे घोशीत केले. अश्या प्रकारे अश्वीनी उईके उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार राकेश नलगुंडवार मो क्र ८८३०८७९१४१ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत सातगाव वार्ड क्र ०१ ता. हिंगणा जि नागपुर येथे दिनांक १०/०९/२०२२ चे २१.०० वा. पुर्वी **नितीन देवराव निंदेकर(मृतक), वय ३२ वर्ष, रा. सातगाव वार्ड क्र ०१, ता. हिंगणा जि. नागपुर** यांची पत्नी ही आपल्या प्रियकर सोबत पळुन गेल्याने मृतक हा नेहमी दारू पित होता व चिंतेत राहत होता. फिर्यादी हे त्यांच्या रूममध्ये नितीन निंदेकर याला जेवन करण्याकरीता बोलविण्यासाठी गेले असता ते सिंलीग च्या लोखंडी कडी ला साडीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सचिन देवराव निंदेकर, वय ३३ वर्ष, रा. सातगाव वार्ड क्र ०१, ता. हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनी श्री रेजीवाड मो.क्र. ९८३४८२५७९३ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत डोरली भांडवलकर येथे दिनांक ११/०९/२०२२ चे १०.३० वा. पुर्वी **गणेश शेषराव सावदे (मृतक), वय २५ वर्ष, रा. डेराली भांडवलकर** याला मागील दोन ते तिन वर्षा पासुन डोके दुखीचा त्रास असुन त्याने या त्रासाला कंटाळुन त्याचे राहते घरी छताला दोर बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. कांता शेषराव सावदे, वय ५७ वर्ष, रा. डेराली भांडवलकर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो.नं. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी:– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा आमडी फाटा जी.एन. निकम कंपनी येथे दिनांक १०/०९/२०२२ चे १५.३० वा. ते दिनांक ११/०९/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान **रमेश रामसुचीत कैथवास (मृतक), वय ५५ वर्ष, रा. वाघधरेवाडी कन्हान** हे आमडी फाटा जी.एन निकम कंपनी येथे ट्रकवर ड्रायव्हरचे काम करीत होते. ते आपले ट्रकच्या बाजुला ट्रकच्या कॅबीन मधील सीट जमीनीवर खाली ठेवुन गार्डनजवळ झोपले असता त्यांच्या पायाच्या टोगळयाच्या मागे पोटरीच्या वर विषारी सापाने चावा घेतल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आकाश श्रीपद चिखले, वय २४ वर्ष, रा. विवेकआनंद नगर कन्हान यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक अमित यादव मो.नं. ७९७२८४५०४० हे करीत आहे.

## नैसर्गिक विज पडुन मृत्यू

१) पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा भागेबोरी शेतशिवार येथे दिनांक ११/०९/२०२२ चे १७.३० वा. दरम्यान **गुंडेराव भाउराव गेडाम (मृतक), वय ४५ वर्ष रा. मांगली जगताप त. भिवापूर** हे भागेबोरी शिवारात प्रविण पूंडलीक जळीत रा. भिवापूर यांचे शेतात काम करण्यास गेले होते. अचानक वादळ येवून पाउस सुरू झाला व विजा कडकडू लागल्यामूळे गुंडेराव गेडाम हे बैलबंडी जूपून घरी परत येत असता त्यांच्या अंगावर वीज पडल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कोमलदास भाउराव गेडाम, वय ४२ वर्ष रा. मांगली जगताप त.भिवापूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र डहाके मो.क्र. ९८९८२३५१७४१२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा भागेबोरी शेतशिवार येथे दिनांक ११/०९/२२ चे १७.३० वा. दरम्यान **ओमेश्वर प्रभुजी पोपटकर, वय ४५ वर्ष रा. मांगली जगताप ता.भिवापूर** हे भागेबोरी शिवारात प्रविण पूंडलीक जळीत, रा. भिवापूर यांचे शेतात काम करण्यास गेले होते. अचानक वादळ येवून पाउस सूरू झाला व विजा कडकडू लागल्यामुळे मृतक हे बैलबंडी जूपून घरी परत येत असता मृतकाच्या अंगावर वीज पडून ते मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर प्रभुजी पोपटकर, वय ३८ वर्ष रा. मांगली जगताप ता. भिवापूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र डहाके मो.क्र. ९८९८२३५१७४१२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**